# नवसृष्टी



## अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जून २०२४

वर्ष ४९ अंक ०६



श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

आम्ही बनू इच्छितो, तसे शूरवीर योद्धे तू आम्हाला बनव. उदयास येऊ पाहणारा भविष्यकाळ आणि टिकून राहू पाहणारा भूतकाळ यांच्यातील महायुद्धामध्ये विजिगिषू वृत्तीने आम्ही लढू; त्यामुळे नवीन गोष्टी आविष्कृत होतील आणि त्या ग्रहण करण्यास आम्ही सुसज्ज होऊ शकू.

– श्रीमाताजी (CWM 12 : 112)

# नवसृष्टी

संपादकीय....................................................०२
नव्या जगाचा प्रारंभ............................................०३
अतिमानवाच्या चेतनेचा अनुभव...............................१३
अतिमानवतेचे उमेदवार...........................................१७
अतिमानसाच्या अवतरणाचे परिणाम...........................२४

---

## संपादकीय

मानव हा उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा नाही. प्रकृतीची वाटचाल अजूनही पुढे चालूच राहणार आहे. मानवाहून अधिक प्रगत अशा जीवयोनीच्या जन्माची तयारी प्रकृती करत आहे. ‘अतिमानसिक’ जिवाचा उदय ही उत्क्रांतीची पुढची झेप असेल. ‘अतिमानव’ म्हणजे मानव ते अतिमानसिक जीव यामधील एक विश्रांती-स्थान असेल, असे श्रीअरविंदांनी सांगितलेले आहे. श्रीमाताजींच्या दिव्य दृष्टीला आपले सद्यकालीन जग, भविष्यकालीन जग, अतिमानव, अतिमानसिक चेतना या साऱ्याचा अनुभव आला होता. त्या अनुभवाच्या आधारे, त्यांनी एकंदरच मानवजातीला जे सांगितले आहे, त्यावर ‘अभीप्सा’ मासिकाचा हा अंक आधारित आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

‘अभीप्सा’ मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). ‘श्रीअरविंद आश्रम’ हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# नव्या जगाचा प्रारंभ

## नव्या जगाचे आकलन

(०९ जुलै १९५७ रोजी श्रीमाताजींना आपल्या सद्यकालीन जगाचा आणि नव्या जगाचा एकत्रितपणे असा एक अनुभव आला. त्या अनुभवाचे कथन त्या करत आहेत.)

व्यक्तीला आपल्या जुन्या सवयींपासून मुक्त होऊन, अगदी मुक्तपणे एका नवीन जीवनाची, एका नवीन जगाची कल्पना करता येणे काहीसे अवघड असते. साहजिकच, या मुक्तीचा आरंभ चेतनेच्या उच्चतर स्तरांवर होतो. म्हणजे, नवीन गोष्टींची कल्पना करणे (उदाहरणार्थ, गोष्टींचा नवीन पद्धतीने अनुभव घेणे) हे प्राणमय पुरुषापेक्षा मनाला किंवा उच्चतर बुद्धिमत्तेला अधिक सोपे असते. आणि नवीन जग कसे असेल याचे अगदी प्रत्यक्षरित्या आकलन होणे हे शरीरासाठी तर अधिकच कठीण असते. आणि तरीही भौतिक रूपांतरण होण्यापूर्वी हे प्रत्यक्ष आकलन झालेच पाहिजे. प्रथम व्यक्तीला जुन्या गोष्टींमधील विचित्रपणा, त्या गोष्टींची निरुपयोगिता अगदी ठाशीवपणे जाणवली पाहिजे. त्या गोष्टी आता कालबाह्य झाल्या आहेत, त्या भूतकाळाशी संबंधित होत्या आणि आता मात्र त्यांचा काही उपयोग नाही, ही जाणीव व्यक्तीला झाली पाहिजे. एवढेच नव्हे तर, हा अनुभव अगदी इंद्रियसंवेद्य झाला पाहिजे.

...नवीन जगाच्या निर्मितीबाबत सांगायचे झाले तर, संक्रमणाच्या सातत्यामुळे वरकरणी असे दिसून येते, किंवा खरंतर असे वाटते की, परस्परांपासून अगदी पूर्णपणे असंबद्ध असणाऱ्या दोन गोष्टी परस्परांमध्ये मिसळलेल्या आहेत. आणि असेही दिसते की, भूतकाळातील गोष्टींमध्ये, कितीही सुधारणा केल्या तरी त्यांच्यामध्ये, नवीन गोष्टींच्या बरोबरीने टिकून राहण्याची ताकद किंवा शक्ती आता शिल्लक राहिलेली नाही. नवीन जग हा अनिवार्यपणे एक संपूर्णतः नवीन अनुभव असणार आहे. आत्ताच्या काळाशी साधर्म्य राखणारा असा एखादा काळ इतिहासात

शोधायचा झाल्यास, प्राण्याचे मानवी सृष्टीमध्ये जे संक्रमण घडून आले त्या काळातच व्यक्तीला डोकवावे लागेल. पण या प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी, तिचे आकलन करण्यासाठी, तिची बुद्धिपूर्वक जाणीव करून घेण्यासाठी आवश्यक असणारी चेतना त्या काळी मानसिकदृष्ट्या पुरेशी सक्षम नव्हती. (आणि त्यामुळे) प्राण्याचे मनुष्यामध्ये झालेले हे संक्रमण पूर्णपणे अज्ञात पद्धतीने झालेले असणार.

## जुने जग आणि नवे जग

म्हणून मी आत्ता तुम्हाला जे काही सांगत आहे ते सर्वस्वी नवीन आहे, ते या पार्थिव सृष्टीमध्ये अनन्यसाधारण असे आहे. हे काहीतरी अभूतपूर्व असे आहे. खरोखर हे असे एक आकलन आहे, अशी एक संवेदना आहे, हा असा एक प्रभाव आहे की, हे सारे अगदी पूर्णपणे अपरिचित आणि नवीन आहे. दोन गोष्टी असंबद्ध आहेत. एक गोष्ट (जुने जग) अपेक्षेपेक्षा अधिक काळ टिकून राहिली आहे आणि ती अस्तित्वाची अगदीच गौण शक्ती आहे. तर दुसरी गोष्ट (नवीन जग) पूर्णपणे नवीन आहे, पण अजूनही खूप लहान, अगदी असंवेद्य आहे, अगदी दुर्बल आहे, म्हणजे असे की, पहिल्या गोष्टीची (जुन्या जगाची) जागा घेण्यासाठी, त्याच्यावर वर्चस्व गाजविण्यासाठी, स्वतःची बाजू लावून धरण्यासाठी आवश्यक असणारे बळ अजूनपर्यंत तिच्यामध्ये (नवीन जगाकडे) नाही. या दोन्ही गोष्टी एकत्रित आहेत खऱ्या, पण, मी तुम्हाला सांगितले त्याप्रमाणे त्या दोन्ही गोष्टींमध्ये काहीही संबंध नाहीये. म्हणजे त्या दोन गोष्टींमधील दुवा हरवलेला आहे.

वास्तविक या सगळ्याचे वर्णन करणे अतिशय अवघड आहे, पण मी तुम्हाला हे सगळं सांगत आहे कारण काल संध्याकाळी मला त्याचा अनुभव आला. मला ते इतके तीव्रपणे जाणवले की, त्यामुळे काही गोष्टींचा (नव्याने) विचार करणे मला भाग पडले. आणि जेव्हा मी त्या सगळ्याकडे पाहिले तेव्हा मला असे जाणवले की, हे तुम्हाला सांगणे

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)

तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)

पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)

देणगीदार : ४००० रू.

(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society

बँकेचे नाव : Central Bank of India

IFSC Code : CBIN0281354

A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# सृष्टीनिर्मितीची कहाणी

श्रीमाताजींनी विश्वनिर्मितीची कहाणी सांगितली आहे. सुरुवातीला एक विश्वमाता होती. ती या सृष्टीची स्वामिनी होती. या सृष्टीनिर्मितीसाठी तिने चार विभूती निर्माण केल्या. त्या म्हणजे चेतना किंवा प्रकाश, प्राण किंवा जीवन, आनंद किंवा सौंदर्य आणि चौथी विभूती म्हणजे सत्य.

स्व-सामर्थ्याच्या जाणिवेचे भान असलेल्या या चार विभूती पुढे आपल्या मूलतत्त्वापासून विभक्त झाल्या. सेवकाची विनम्र भूमिका धारण करून कार्य करण्याऐवजी त्या स्वतःलाच सर्वशक्तिमान समजू लागल्या. आपल्या मूलतत्त्वाशी एकनिष्ठ राहण्याऐवजी त्यांनी तो धागा तोडून टाकला आणि त्यांनी आपापल्या संकल्पनांनुसार कार्य करायला सुरुवात केली. तेव्हा स्वाभाविकपणेच प्रकाशाचे रूपांतर काळोखामध्ये, जीवनाचे मृत्युमध्ये, आनंदाचे दुःखामध्ये आणि सत्याचे रूपांतर मिथ्यत्वामध्ये झाले. अचेतनेचा असुर, मिथ्यत्वाचा असुर, दुःखभोगाचा असुर आणि मृत्युचा असुर हेच ते चार असुर! आज आपल्याला जे जग अनुभवास येत आहे ते त्यांच्याच प्रभावाखाली आहे.

परंतु जेव्हा हे सारे अशा रीतीने घडून आले तेव्हा 'दिव्य चेतना' परम-ईश्वराकडे गेली आणि त्याला म्हणाली, ''हे असे असे घडले आहे, आता काय करायचे?'' तेव्हा तिला आज्ञा देण्यात आली की, तिने तिची चेतना या अचेतनतेमध्ये, तिचे प्रेम या दुःखभोगामध्ये आणि तिचे सत्य या असत्यामध्ये संक्रमित करावे. 'दिव्य चेतने'ने त्या आज्ञेचे पालन केले आणि त्यामुळे, प्रारंभी ज्या चार विभूतींची उत्पत्ती झाली होती त्यापेक्षाही अधिक महान चेतना, अधिक परिपूर्ण प्रेम आणि अधिक परिपूर्ण सत्य यांनी जडभौतिक विश्वाच्या भीषणतेमध्ये उडी घेतली. या जडभौतिक विश्वामध्ये चेतना, प्रेम आणि सत्य जागृत करावे आणि या भौतिक विश्वाला पुन्हा त्याच्या परमश्रेष्ठ उगमाकडे घेऊन जाण्यासाठीची वाटचाल सुरू व्हावी या हेतुने ही उडी घेतली गेली होती. आणि त्याचा सद्यकालीन परिणाम म्हणजे अचेतनामधून उदयाला आलेले 'अतिमानस'.

''अर्थात, अतिमानसिक सृष्टी हीच अखेरची सृष्टी असेल असे नाही. कारण परब्रह्म हे अक्षय (inexhaustible) आहे आणि त्यामुळे त्याच्याद्वारे नवनवीन सृष्टीची निर्मिती होतच राहील'', असे श्रीमाताजी म्हणतात.

– आधारित (CWM 09 : 206-208)

*

# आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमश:)

## ०५ डिसेंबर २००१

ईश्वरी कृपा आणि संरक्षण नेहमीच तुमच्यासोबत असते. तुम्ही कोणत्याही आंतरिक किंवा बाह्य अडचणींना, संकटांना शिरजोर होऊ देऊ नका. संरक्षण करणाऱ्या 'दिव्य शक्ती'चा आश्रय घ्या.

तुम्ही जर नेहमीच असे श्रद्धेने आणि प्रामाणिकपणे वागलात तर, पृष्ठभागावर दिसणाऱ्या सर्व प्रकारच्या खळबळीमध्ये देखील जे नेहमीच स्थिरशांत असते असे, तुमच्यामधील काहीतरी खुले होत आहे, असे तुम्हाला आढळेल.

– श्रीअरविंद (CWSA 31 : 724-725)

*

## ०१ जानेवारी २००२

व्यक्तीला श्रीमाताजींकडून जे जे काही प्राप्त होते ते सर्व माझ्याकडूनही आलेले असते, त्यामध्ये कोणताही भेद नसतो. आणि त्याचप्रमाणे, मी जर काही दिले, तर ते श्रीमाताजींच्या 'शक्ती'द्वारे साधकापर्यंत पोहोचते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 80)

*

## २१ फेब्रुवारी २००२

श्रीमाताजींचे तुमच्याकडे लक्ष आहे असे समजून नेहमी तुमचे वर्तन असले पाहिजे ; कारण त्या खरोखरच उपस्थित असतात.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 169)

*

हे काही निव्वळ एक विधान नाही, हे नुसते पोकळ शब्द नाहीत, तर ती वस्तुस्थिती आहे. मी तुमच्यासोबत खरोखरच अगदी सघन रीतीने उपस्थित असते आणि ज्यांच्याकडे सूक्ष्म दृष्टी आहे ते मला पाहू शकतात.

– श्रीमाताजी (CWM 13 : 73)

*